# डी.वाय.पाटील युनिव्हर्सिटीला 'सायबर शिक्षण' पुरस्कार

## राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते गौरव

कोल्हापूर : हॅलो प्रभात

तळसंदे येथील डी. वाय. पाटील ग्रीकल्चरल अँण्ड टेक्निकल युनिव्हर्सिटीचा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याहस्ते 'सायबर सुरक्षेकरिता सायबर शिक्षण'साठी राष्ट्रीय स्तरावरील 'विजेता पुरस्कारा'ने गौरव करण्यात आला. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांच्याकडून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये नूतन महाविद्यालयीन विभागात सर्वोत्कृष्ट क्लब म्हणून डी. वाय. पाटील अ‍ॅग्रीकल्चरल अँण्ड टेक्निकल युनिव्हर्सिटीचा गौरव करण्यात आला. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, महाराष्ट्र सायबरचे उप महानिरीक्षक संजय शिंत्रे, क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, क्विक हिल टेक्नॉलॉजीस लि. चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास काटकर, सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय काटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल साळवी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले, क्विक हीलफाउंडेशनने आयोजित केलेल्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा पुरस्कारांमध्ये युवकांसोबत सामील होताना आनंद होत आहे. २०१६ पासून आतापर्यंत ५४ लाख लोकांपर्यंत सायबर सुरक्षेबद्दल जागरूकता केल्याबद्दल फाउंडेशन आणि क्विक हील टेक्नॉलॉजीसचे अभिनंदन. फाउंडेशनने विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षित समाज निर्माण करण्यासाठी सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. या फाउंडेशनबरोबर जोडले जाऊन तळागाळापर्यंत काम केलेले सर्व 'सायबर वॉरियर्स' कौतुकास पात्र आहेत.




ते पुढे म्हणाले, सायबर सुरक्षा ही भारतासह जगभरातील सर्वात गंभीर चिंतांपैकी एक म्हणून उदयास आली आहे. नवीन कायदे करण्यासह असलेली धोरणे अधिक मजबूत करणे, सायबरसुरक्षेत अधिक गुंतवणूक करणे, यासह जागरूकता पसरवण्यावर अर्थात तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांना आणि विशेषतः विद्यार्थ्यांना सुरक्षित ऑनलाइन पद्धतींबद्दल शिक्षित करणे यावर भर द्यावा लागेल, असेही ते म्हणाले. विजेता संघातील विद्यार्थी, क्लब ऑफिसर्स महंमदअली मकडी, अथर्व जोशी, सत्यजीत जाधव, शिवांश उथळे शिक्षक समन्वयक डॉ. वर्षा देसाई यांचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष सतेज पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील कुलगुरू डॉ. के. प्रथापन, कुलसचिव डॉ. जयेंद्र खोत व संगणक शास्त्र व अभियांत्रिकी विभागाचे अधिष्ठता डॉ. संग्राम पाटील आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.